# <u>प्रेसनोट</u>

**<u>पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 58/2022 दिनांक : 12.02.2022</u>**

## 1)घरफोडी :–

**मरखेल :–**दिनांक 10.02.2022 रोजी चे 16.00 वा. ते दि. 11.02.2022 चे 09.00 वा. चे दरम्यान, **जि. प. हायस्कुल हाणेगाव ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने जि. प. हायस्कुल हाणेगाव शाळेचे कडी कोंडा कापुन आत प्रवेश करुन तांदुळ चार क्विंटल किंमती 8,000/–रु, मुग दाळ दोन क्विंटल किंमती 9,000/–रु हारभरा पाच क्विंटल किंमती 16,000/–रु असा एकुण 33,000/–रुपयाचा माल चोरुन नेला आहे. वगैरे **फिर्यादी शिवानंद नागभुषण शिवाचार्य, वय 56 वर्षे, व्यवसाय मुख्याध्यापक जि. प. हायस्कुल हाणेगाव ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 28/2022 कलम 454,457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/94 शेख, मो.क्र. 7776067774** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**हदगाव :–**दिनांक 07.02.2022 रोजी चे 23.00 ते दि. 08.02.2022 चे 05.00 वा. चे दरम्यान, **मौ. निवघा बाजार ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा स्प्लेंडर प्लस कंपनीची काळया रंगाची मो.सा. क्र. एमएच–29/यु–8071 किंमती 20,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी अमोल शंकरराव माने, वय 29 वर्षे, व्यवसाय शेती रा. गोपाळचावडी, आंबेडकर चौक निवघा बाजार ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरनं 36/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/900 सातपुते, मो.क्र. 8329976264** हे करीत आहेत.

## 3)रेती चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 11.02.2022 रोजी चे 22.00 वा. चे सुमारास, **मौजे असर्जन येथील गोदावरी नदीचे पात्रात,नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी टिपर क्रं. एम.एच./18–एम–9609 चा चालक याने टिपर मालक याचे सहमतीने अनाधिकृत वाळु वाहतुकीबाबत कोणतेही पुर्व परवानगी न घेता शासकीय वस्तु रेती चोरी केली. वगैरे **फिर्यादी श्रीमती संजीवणी भाऊराव मुपडे, वय 34 वर्षे, व्यवसाय नौकरी नायब तहसीलदार महसुल–1 तहसील कार्यालय नांदेड रा. वाडी बु. ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 78/2022 कलम 379 भादवी सह कलम 48 (7) व (8) सार्वजनिक मालमत्ता संपतीची हानी प्रतिबंध अधिनियम सन 1984 चे कलम 3 व मोटार वाहन कायदा कलम 79/177 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री कदम, मो. क्र. 9284351496** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**रामतीर्थ :–**दिनांक 11.02.2022 रोजी चे 14.30 वा. चे सुमारास, **शंकरनगर बसस्थानक, ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस आरोपीने तु माझ्या बायकोला बोलतोस तु माझ्या संसाराचा सत्यानाश केलास असे म्हणुन शिवीगाळ करुन फिर्यादीचे पोटात चाकूने मारुन गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी माधव नारायण वाघमारे, वय 30 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. डोणगाव खुर्द ता. बिलोली जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे रामतीर्थ** गुरन 23/2022 कलम 326,504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोउपनि/श्री इंगळे, मो. नं. 7066981443** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 11.02.2022 रोजी चे 16.10 वा. चे सुमारास, **भावेश्वर नगर मरघाट कमानजवळ रोडवर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 1530/–रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोह/2434 प्रमोद गोविंदराव कऱ्हाळे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 77/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/2306 चंचलवाड, मो.क्र. 9730192361** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :—** दिनांक 11.02.2022 रोजी चे 13.30 वा. चे सुमारास, **आनंदनगर चौकाजवळ ठाकरे कॉम्पलेक्स समोरील रस्त्यावर,नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 2220/—रुपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1138 बालाजी दत्ता तेलंग, ने. पोस्टे स्थागुशा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 54/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/591 नागरगोजे**, **मो.क्र. 8412879395** हे करीत आहेत.

## 6)गळफास घेवुन मृत्यु :—

**भाग्यनगर :—**दिनांक 11.02.2022 रोजी चे 06.30 वा. सुमारास, **सिध्दी विनायकनगर नांदेड येथे**, यातील **मयत नामे रामु अशोककुकुटला, वय 38 वर्षे, रा. सिध्दी विनायकनगर, नांदेड**, हा घराचे किचन रुम मधील छताचे गजाळी चे हुकाला साडीने गळफास घेवुन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार सतिष नरसिंगकुकुटला, वय 28 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. सोमेश कॉलनी, नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे भाग्यनगर** आ. मृ. **10**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2309 जाधव, मो.नं. 9049343095** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 59 / 2022 दिनांक : 12.02.2022**

**पोस्टे विमानतळ येथे जप्त केलेल्या वाहानांचा लिलाव...**

पोस्टे विमानतळ नांदेड येथे जप्त केलेल्या दोन चाकी, तीन चाकी, चार चाकी, वाहाने बऱ्याच दिवसा पासुन बेवारस स्थितीत पडुन आहेत. सदर वाहनां बदल सर्वांना अव्हान करुन मालकी हक्क सांगुन वेळोवेळी घेउन जाणे बाबत अव्हान करण्यात आले होते. परंतु सदर वाहानांचा कोणीही मालकी हक्क न सांगीतल्याने मा. तहसीलदार यांनी कायदेषीर बाबतची पडताळणी करुन सदरची वाहने जाहील लीलाव द्वारे विक्री करुन सदरची रक्कम शासन जमा करण्याचे आदेशीत केले आहे. यातील सर्व वाहाने यांचे जाहीर लीलावाने विक्री करण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत. मा. वरिष्ठांचे आदेशान्वये सदर वहानाचा पोस्टे विमानतळ येथे दिनांक 18.02.2022 रोजी 10.00 वा. एकुण 55 बेवारस वहानाचे आहे त्या स्थिती मध्ये जाहीर लिलावा द्वारे (बोली लावुन) विक्री करण्याचे ठरविण्यात आले आहेत. सदर लिलाव करते वेळी कांही तांत्रीक आडचणी आल्यास जाहीर लिलावा बाबत सर्व हक्क राखुन ठेवले आहेत. या बाबत कोणालाही दाद मागता येणार नाही. सदर लिलावात पोलीस अधिकारी व अंमलदार यांना भाग घेता येणार नाही.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड